अति महत्वाचे

दूरध्वनी क्र. : 022-2261 8987
022-227 08738
Email ID : supt.statunit@gmail.com

# University of Mumbai

सांख्यिकी कक्ष,
फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.

**No.UDSTAT/ICD/MIS/2017-18/ 105 of 2017**

परिपत्रक:—

विषय :— व्यवस्थापकीय माहिती पद्धत (MIS) शैक्षणिक वर्ष २०१७—१८ ऑनलाईन माहिती भरणेबाबत. (www.dhemis.maharashtra.gov.in)

संदर्भ :— क्र. उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१७—१८/११८००, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७.

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांचे संबंधित परिपत्रकाकडे लक्ष वेधू इच्छितो की, राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी व महाविद्यालये/संस्था यांचे सर्वेक्षणामध्ये समावेश होण्याच्या दृष्टीकोनात विचार करता शैक्षणिक वर्ष २०१७—१८याकरीता महत्वाची असलेली Online माहिती त्यांनी दिलेल्या www.dhemis.maharashra.gov.in या Web Portal वर उपलब्ध असलेल्या विवरण—पत्रामध्ये Online स्वरूपात नोंदविणे आवश्यक आहे.

**MIS - व्यवस्थापकीय माहिती पद्धत :—**
**शैक्षणिक वर्ष २०१७—१८ वर्षाकरीता संचालनालयाकडून विचारण्यात आलेल्या Online पद्धती नुसार प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती आपल्या महाविद्यालयाकडून नोंदविण्यासाठी संबधित काम हे संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या व कार्यालयीन कामाची योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्याच्या हेतूने ती संचालनालयास त्वरीत सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे संचालनालयाच्या आदेशानुसार त्यांना आवश्यक असलेली माहिती आपल्या महाविद्यालयाकडून सादर झाल्यानंतर त्या बाबतचे प्रमाणपत्र सदर कक्षामार्फत महिन्याच्या प्रत्येक आठवडा अखेर सादर करण्यास सुचित करण्यात आलेले आहे, याची दखल घ्यावी.**

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालय/संस्थेमार्फत भरण्यात आलेल्या ऑनलाईन माहितीमध्ये ब—याचश्या त्रुटी संचालनालयाच्या निदर्शनास आल्या, त्या खालील प्रमाणे:—

१. माहिती नोंदणी करताना काही महाविद्यालये विशेषत: विनाअनुदानित महाविद्यालये प्रणालीमधील सर्व मॉडयूल्सची माहिती भरत नसल्याचे आढळले. मॉडयूल्समधील विशेषत: शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा—यांची माहिती व्यवस्थितपणे व पुर्ण भरली जात नाही.

२. माहिती भरताना नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा जास्त दर्शविण्यात येते. तसेच नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली जात नाही, केवळ उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली जाते.

३. शासकीय/अनुदानित/अंशत: अनुदानित/विना अनुदानित/ग्रामीण/शहरी/आदिवासी/केवळ मुलीं करीता/अल्पसंख्यांकांचे महाविद्यालये (भाषिक/धार्मिक) याबाबतचे वर्गीकरण महाविद्यालयामार्फत व्यवस्थितरित्या प्रणालीमध्ये दर्शविले जात नाही. त्यामुळे वरील बाबींच्या राज्यस्तरावरील एकूण आकडेवारीमध्ये तफावत आढळून येते.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता आपल्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सर्वेक्षणाद्वारे शासनास उपलब्ध असलेली विविध शैक्षणिक बाबींची महत्वाची माहिती लक्षात घेता महाविद्यालये/संस्था यांनी ती Online पद्धतीने अचूकतेने नोंदविणे अत्यंत आवश्यक आहे. व त्याचप्रमाणे आपले अधिकारी वर्ग/कर्मचारी वर्ग यांना आपल्या उच्चस्थरावरून सुचित करावे की, प्रती शैक्षणिक वर्षानुसार Web Portal वर उपलब्ध असलेल्या विवरण पत्रानुसार ऑनलाईन स्वरूपातील माहिती महाविद्यालयीन शिक्का व आपल्या सहिनिशी परिपुर्ण असलेल्या प्रमाणपत्रासहीत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे अन्यथा विद्यापीठीय कार्यालयीन कार्यवाही (Enrolment Form/Affiliation of Continuation/Extension/Approval of Principals & Teachers Etc.) इत्यादी गोष्टी तपासली किंवा स्विकारली जाणार नाहीत.

—२—

Scanned by CamScanner

# University of Mumbai

त्याचप्रमाणे संबंधित सर्वेक्षणाच्या कामकाजाबाबत एखादया कोणत्याही महाविद्यालय/संस्था यांनी आपली संबंधित Online स्वरूपातील माहितीबाबतची नोंद न केल्यास त्यांची नावे काळया यादीत (Black List) दाखविण्यात यावी व विद्यापीठ Website वर Highlight करून दर्शविण्यात यावेत, असे आदेश देखील संचालक, महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण विभाग, पुणे, यांनी दिलेले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

सर्वेक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून Online स्वरूपातील माहिती विवरण पत्रामध्ये भरण्याबाबत आपणास काही समस्या/अडचणी उद्भवल्यास खालील दिलेल्या रकान्यातील ठिकाणानूसार संर्पक साधावा. जेणेकरून संचालनालयास कार्यालयीन कार्यवाही अचूकतेने, विनांविलंब व सोयीस्कररित्या करता येईल. त्याचप्रमाणे तत्संबंधित हमीपत्र/प्रमाणपत्र भरून मुंबई विद्यापीठ, सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून ना—हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) घ्यावे.

| Contact Person | Office | Land Line No. | E-mail ID |
|---|---|---|---|
| MIS Call Centre, Pune | Director of Higher Education, Government of Maharashtra, Pune. | 020 - 6500 1173<br>020 - 6500 1016 | stat.dhepune@nic.in |
| Nodal Officer (AISHE/MIS Cell) | University of Mumbai, Statistical Unit, Room No. 202, Fort, Mumbai- 400 032. | 022 - 2270 8738<br>022 - 2261 8987 | supt.statunit@gmail.com |

**टिप्पणी :— MIS बाबतची माहिती फक्त कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांनी भरणे व तसेच सदरची ऑनलाईन माहिती दिनांक १५ डिसेंबर, २०१७ पर्यंत भरणे अनिवार्य आहे. (वास्तूशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन व औषधशास्त्र अभ्यासक्रम वगळता).**

मुंबई— ४०० ०३२
दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०१७

नोडल अधिकारी
**(AISHE/MIS)**

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवाना:—

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत, पुणे—४११ ००१.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई—४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदवुत्तर विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई—४०० ०९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई—४०० ०९८.

**यांना असे कळविण्यात येते की, MIS बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्नीत महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिवार्य असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालये/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज (Exam.Form) व नोंदणी अर्ज (Enrollment Form) महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension) /प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) व महाविदयालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील कार्यालयीन कार्यवाही करावी.**

नोडल अधिकारी
**(AISHE/MIS)**

Scanned by CamScanner